लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शुक्रवार – २५ ऑगस्ट २०२३
वर्ष – ३७ वे
अंक – १४५
पाने – ४
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

किंमत २ रूपये




# शरद पवार म्हणतात मी तसं बोललोच नाही

सातारा : राष्ट्रवादीत फुट नाही. आमच्यापैकी काही लोकांनी एक वेगळा निर्णय घेतलेला आहे, असे वक्तव्य काल गुरुवारी खा. सुप्रिया सुळे यांनी केले होते. ज्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगल्या होत्या. पण काल लेकीने केलेल्या वक्तव्याला आज शरद पवार यांच्याकडून सुद्धा दुजोरा देण्यात आला होता. अजित पवार आमचेच नेते आहेत, काही लोकांनी वेगळा निर्णय घेतला म्हणून फूट म्हणायचे कारण नाही, असे वक्तव्य आज सकाळी बारामती येथे पत्रकारांशी बोलताना शरद पवार यांनी केले. परंतु, आता त्यांनी त्यांच्या या वक्तव्यावरून घुमजाव केले आहे. मी असे काही बोललो नसल्याचे त्यांनी पत्रकारांकडून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नावर म्हटले आहे. त्यामुळे काही तासांमध्ये शरद पवारांनी स्वतःच्याच वक्तव्यावरून यु-टर्न घेतल्याने आणखी एक संभ्रम निर्माण झाला आहे.

आज सकाळी बारामती आणि आता साताऱ्यातील दहिवडी येथून केलेल्या दोन्ही वक्तव्यामुळे शरद पवार यांची राजकीय खेळी अद्यापतरी कोणाच्याही लक्षात आलेली नाही. अजित पवार आमचेच नेते आहेतपासून ते मी असे काही बोललोच नाही हे सांगायला शरद पवार यांना फक्त ५ तास लागले. अजित पवार आमचे नेते असे मी म्हटले नाही. सुप्रिया असे म्हणू शकते. मी नाही,



असा दावा साताऱ्यातील दहिवडी येथून बोलताना शरद पवार यांनी प्रसार माध्यमांसमोर केला आहे.

यावेळी पत्रकारांकडून पक्षा फुटीबाबत शरद पवार यांना प्रश्न करण्यात आला. याबाबत बोलताना ते म्हणाले की, आम्ही कारवाईची मागणी केली. तुम्ही आमच्या पक्षात असाल आणि तुम्ही काही चुकीची भूमिका घेतली आणि मी तुमच्यावर कारवाई केली याचा अर्थ ती पक्षातील फूट नाही, असे शरद पवार यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

तर अजित पवार यांना पुन्हा राष्ट्रवादीत संधी देणार का? असा प्रश्न पत्रकारांकडून उपस्थित करण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देत ते म्हणाले की, एकदा एखादी भूमिका घेतली असेल करेक्शन केली असेल, तर ती संधी झाली. एकदा पहाटेचा शपथ विधी झाला होता. दोन लोकांचा हा शपथविधी होता. त्यात आमचेही एक सहभागी होते. त्यावेळी आम्ही निर्णय घेतला होता. त्यानंतर त्यांनी माझ्याकडून जे झाले ते योग्य नव्हते, आता त्या मार्गाने जाणार नाही असे म्हटले होते. त्यामुळे त्यांना संधी दिली होती, पण संधी मागायची नसते. संधी द्यायची नसते. आमची हीच भूमिका आहे, असे म्हणत शरद पवारांनी अजित पवारांसाठी राष्ट्रवादीचे दरवाजे बंद केले असल्याचेच दिसून येत आहे.

ते आमचेच आहेत. त्यात काही वाद नाही. फूट पडली याचा अर्थ काय? पक्षात फूट कधी येते, जेव्हा पक्षातच एक मोठा वर्ग वेगळा झाला देशपातळीवर, अशी स्थिती इकडे नाही.

काही लोकांनी पक्ष सोडला काही लोकांनी वेगळी भूमिका घेतली आणि तो लोकशाहीमध्ये त्यांचा अधिकार आहे. जो त्यांनी निर्णय घेतला म्हणून लगेच फूट म्हणायचं काही कारण नाही तो त्यांचा निर्णय आहे, असे विधान शरद पवार यांनी केले होते.



## पोलीस कुठे काय करते

लातूर शहरातील वाहतुकीची कोंडी हा नागरिकांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरात प्रमुख रस्ते, चौक या ठिकाणी सतत वाहतुकीची कोंडी निर्माण झाल्याचे दिसून येते. लातूर शहरातील शहीद वीर भगतसिंग चौक (पीव्हीआर चौक) हा रिंग रोडवरील चौक आहे. पण, या चौकात दिवसभर ट्राफीक जाम होते. याचा त्रास या चौकातून जाणाऱ्या वाहनधारकांना, नागरिकांना होत आहे. मोठी वाहने आल्यानंतर १५-१५ मिनीट चौकातून सुटकाच होत नाही. अशावेळी वाहतूक पोलीस कुठे काय करते, असा प्रश्न नागरिकांच्या मनामध्ये उपस्थित होत आहे.

# ऑटोरिक्षास ई चलनातून वगळावे

लातूर : ऑटो चालकास पोलिसांकडून आकारण्यात येणाऱ्या फोटोशूट ई चलनातून वगळावे, नवीन ऑटोरिक्षा स्टॅन्डला मंजुरी द्यावी, शहर बस वाहतूक सिटी बसचे मुख्य स्थानक कोठे आहे त्याच ठिकाणापासून व्हावी या अन्य मागण्यांचे निवेदन परवानाधारक रिक्षा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.

लातूर शहरातील वाढत्या वाहनांमुळे ऑटो व्यवसायात जिवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे. अशावेळी वाहतूक पोलीस नकळत फोटोशूट घेवून ई चलनाच्या माध्यमातून खटले देतात. यामुळे ऑटो चालकाची कोंडी होते. मोठ्या प्रमाणात सर्व कमाई दंड भरण्यातच जाते. हा त्रास कमी करावा, शहरातील ऑटो रिक्षा संख्येवर मर्यादा आणावी, गोलाईसारख्या अत्यंत वर्दळीच्या भागात सिटी बसचे स्थानक कसे काय?, ई रिक्षांना देखील ऑटोरिक्षा प्रमाणे नियम लावावेत. ऑटोरिक्षांचे खुले परमीट वाटप तात्काळ बंद करावे या व अन्य काही मागण्यांचे निवेदन परवानाधारक रिक्षा संघटनेच्या वतीने देण्यात आले आहे. या निवेदनावर संघटनेचे सुरेश शिंदे, मच्छिंद्र कांबळे, अन्वर पठाण, बालाजी बारबोले, रघुनाथ सपकाळ, गोवर्धन गंगणे, वसंतराव ढमाले, अरविंद शिंदे, उमाकांत पवार, हसन शेख, मधुकर सकट, रंजीत कसबे आदींच्या सह्या आहेत.

# निटूरच्या दूरध्वनी केंद्रातून ७४ हजारांच्या साहित्याची चोरी

लातूर : निटूर, ता. निलंगा येथे असलेल्या भारतीय दूरसंचार निगमच्या दूरध्वनी केंद्रातून वेगवेगळ्या स्वरूपाच्या सुमारे ७४ हजार रूपयांच्या साहित्याची चोरी झाल्या प्रकरणी शिरूर अनंतपाळ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

निटूर येथे भारतीय दूरसंचार निगमचे दूरध्वनी केंद्र आहे. चोरट्यांनी या केंद्राचे कुलूप तोडून आत प्रवेश करून केंद्रातील एसटीएम कार्ड, टीआरई कार्ड, एएनसीजी कार्ड, सी-मदर बोर्ड, कॉपर वायर असा मिळून ७४ हजार ५३३ रूपयांचे साहित्य चोरून नेले आहे. या प्रकरणी निलंगा येथील उपविभागीय अधिकारी (बीएसएनएल) सिद्धेश्वर बलभीम महाबोले यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात शिरूर अनंतपाळ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## सर्व घटक पक्षांना सोबत घेवून विकासकामे

राज्याचे क्रीडा मंत्री ना. संजय बनसोडे हे आज लातूर दौऱ्यावर आले आहेत. त्यांची शिवसेनेचे नेते ॲड. बळवंत जाधव यांनी विश्रामगृह येथे भेट घेतली. त्यांच्यासोबत जिल्ह्यातील विकास कामासंदर्भात चर्चा केली. यावेळी ना. बनसोडे यांनी सर्व घटक पक्षांना सोबत घेवून जिल्ह्यातील विकासकामे करू, असे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, राष्ट्रवादीचे बबन भोसले, अजित शिंदे यांची उपस्थिती होती.

# फूट पडली नाही म्हणता तर आमच्या कृतीला समर्थन द्यावे-छगन भुजबळ

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली नाही, अजित पवार हे आमचेच नेते आहेत, असे शरद पवार सांगत आहेत. यावर बोलत असताना छगन भुजबळ यांनी तर आम्ही केलेल्या कृतीला पवार साहेबांनी समर्थन द्यावे, असे मत व्यक्त केले आहे.

अजित पवार तुमचे (शरद पवार) नेते आहेत तर आम्ही देखील तुमचेच कार्यकर्ते आहोत. शरद पवार आमचेच आहेत. आम्ही देखील त्यांना भेटलो आहोत. पक्षात फूट पडली नाही असे ते म्हणत आहेत. मग आता त्यांनी आमच्या कृतीला समर्थन द्यावे, असेही छगन भुजबळ यांनी मत व्यक्त केले आहे.

नाफेड केंद्राकडून कांदा खरेदीसाठी केंद्र वाढवावे लागतील अशी मी सुचना केली आहे. शेतकऱ्यांचे नुकसान पाहून दुःख होत आहे. ते कमी होण्यासाठी आपले प्रयत्न चालू आहेत, असेही मत अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले आहे.

# खरेदीखत झालेल्या प्लॉटवर ५१ लाखांचे कर्ज; मुळ मालकावर गुन्हा

लातूर : कन्हेरी, ता. लातूर शिवारातील एका सर्व्हे नं. मध्ये प्लॉट विकलेला असतानाही त्या प्लॉटवर सुमारे ५१ लाख रूपयांचे कर्ज काढून फसवणूक केल्या प्रकरणी या प्लॉटच्या मुळ मालक व साक्षीदारावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कन्हेरी शिवारातील सर्व्हे नं. २५/ड मधील प्लॉट नं. ९९ (क्षेत्रफळ-१९३६) हा प्लॉट इंद्रजीत व्यंकटराव गोरे यांनी विकत घेतला होता. त्यावेळी त्या प्लॉटच्या सातबारा व ८ अ वर कोणत्याही स्वरूपाचा बोजा नव्हता. नंतर या प्लॉटच्या मुळ मालक व साक्षीदार याने पंजाब नॅशनल बँक शिवनेरी गेट, मार्केट यार्ड या बँकेकडून ५१ लाख ६१ हजार ५७२ रूपयांचे कर्ज काढले. अशा स्वरूपाचे कर्ज काढून फसवणूक केल्या प्रकरणी ॲड. इंद्रजीत व्यंकटराव गोरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून या प्लॉटचे मुळ मालक मुक्ता नामदेव माने, साक्षीदार व ठरावपत्र करून देणारे शिवदास मुदगडे, महानंदा होनराव (वेळापुरे) या तिघा जणांच्या विरोधात विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# मणिपूर हिंसाचार प्रकरणाची चौकशी उच्च न्यायालयाकडे वर्ग

दिल्ली : मणिपूर हिंसाचारामध्ये ज्या प्रकरणामध्ये सीबीआय चौकशी करत आहे त्या सर्व प्रकरणांची सुनावणी आता गुवाहाटी उच्च न्यायालयामध्ये होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने यावर निर्णय दिला आहे. तसेच गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी या प्रकणात अनेक भाषिक न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचे निर्देश देखील सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान मणिपूरमधील हिंसाचारातील एकूण २७ प्रकरणांमध्ये सीबीआय चौकशी करत आहे. ही सर्व २७ प्रकरणं आता गुवाहाटी उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात आली आहे.

मणिपूरमध्ये महिलांची विवस्त्र धिंड काढून त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले होते. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला देखील खडसावले होते. या प्रकरणात सीबीआय मार्फत चौकशी करण्यात येत होती. या प्रकरणातील पिडित महिला या त्यांच्या घरुन ऑनलाइन माध्यमाद्वारे त्यांचा जबाब नोंदवतील अशी विशेष टीप्पणी देखील सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. तसेच मणिपूरमध्ये जिथे स्थानिक मॅजिस्ट्रेट आहेत त्या ठिकाणी इंटरनेटची सुविधा सुरु करण्याचे निर्देश देखील सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

मणिपूरमधील अनेक लोकांनी आसाम किंवा मिझोराम सारख्या राज्यांमध्ये या प्रकरणाची सुनावणी करण्यात यावी अशी याचिका दाखल केली होती. कारण येथील अनेक लोकांना दिल्लीत सुनावणीसाठी येणे कठिण होत होते. त्यासाठी मणिपूरच्या लोकांना आसाम किंवा मिझोराममध्ये सुनावणी होणं सोयीस्कर आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय चौकशीची प्रकरणं ही आसाममधील गुवाहाटी उच्च न्यायालयात वर्ग करण्याचा निर्णय घेतला आहे.

मणिपूरमध्ये सुरु असलेल्या हिंसाचाराची सुनावणी ही सर्वोच्च न्यायालयामध्ये पार पडत आहे.

## त्यांच्या मते....

▣ **गुवाहाटीला जाण्याने आमची प्रचंड बदनामी झाली पण बदनामीच्या मोबदल्यात दिव्यांग मंत्रालय मिळाले**

-बच्चू कडू

- - - - - - - - - - -

☛ बरे झाले दुधाची तहान ताकावर भागविता आली.

▣ **मी बंडखोर आमदारांना डांबून ठेवू शकलो असतो.**

- उद्धव ठाकरे

- - - - - - - - - - -

☛ बंडाची चाहूल लागली नाही असेच ना!

▣ **अजित पवार आमचेच नेते आहेत.**

- शरद पवार

- - - - - - - - - - -

☛ काका-पुतण्याचे नेमके चाललंय काय?

▣ **काहींनी वेगळा निर्णय घेतला पण राष्ट्रवादीत अजिबात फूट पडली नाही.**

- सुप्रिया सुळे

- - - - - - - - - - -

☛ दोन वेगवेगळे तुकडे वावरत असतानाही फूट म्हणायचे नाही, डोकंच चक्रावतय

# पावसाची दडी, राज्यावर भयंकर संकट

## -शरद पवार यांच्याकडून चिंता

सातारा : सध्या राज्यात पावसानं दडी मारली आहे. पाण्याअभावी पिकं माना टाकत आहेत. पिकांना पाण्याची गरज असताना पाऊस पडत नसल्यानं बळीराजा चिंतेत आहे. या परिस्थितीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी चिंता व्यक्त केलीय. पावसानं दडी मारल्यानं शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे. याकडे सरकारनं तात्काळ लक्ष द्यावं, अन्यथा हे संकट अधिक भयंकर होईल असे शरद पवार म्हणाले. सध्याचे सरकार मात्र, शेतकऱ्यांकडे बघायला तयार नसल्याची टीका शरद पवार यांनी केली. ते सातारा जिल्ह्यातीन माणमध्ये बोलत होते.

बीड, नाशिक जिल्ह्यातील शेतकरी, तरुण अस्वस्थ आहेत. आज ज्यांच्या हातात देशाची सत्ता आहे. त्यांना याची आस्था किती आहे हे सांगता येत नाही, असेही पवार म्हणाले. १५ दिवसात यवतमाळमध्ये २१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. कर्जाला कंटाळून या आत्महत्या केल्या आहेत. हे चिन्ह महाराष्ट्रच्या दृष्टीनं चांगलं नसल्याचे शरद पवार म्हणाले.

कधीही कांद्याची एवढी चर्चा झाली नाही तेवढी आता झाली. कांद्याच्या निर्यातीवर सरकारनं मर्यादा आणली आहे. याआधी इतका कर बसवला नाही. मुख्यमंत्र्यांनी माझ्यावर टीका केली. त्यांना मी सांगितले की मी कधी कांद्यावर कर बसवला नसल्याचे शरद पवार म्हणाले. भाजपचे लोक कांद्याच्या माळ घालून आले. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, कांद्याच्या माळ घाला नाहीतर काही करा मी कांद्यावर कर बसवणार नाही असे शरद पवार म्हणाले. शेतकऱ्यांना पैसे मिळाले पाहिजे हे माझं धोरण असल्याचे शरद पवार म्हणाले.

शेतकऱ्यांचा अहिताची धोरणे आखलेल्या लोकांना आमची साथ नाही. शेतकरी विरोधी धोरणाला लोकांच्या मदतीनं आम्ही त्याला विरोध करु असे शरद पवार म्हणाले. कांदा, ऊस टोमॅटो या मालावर बंधने नको. त्याचा उत्पादन खर्च बघून दर मिळाला पाहिजे. जर दर मिळाला नाहीतर आपण संघर्ष केला पाहिजे असे शरद पवार म्हणाले.

सध्या मणिपूर, नागालँडमध्ये संघर्ष सुरु आहे. स्त्रियांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. महिलांची धिंड काढली जाते आणि केंद्र सरकार बघ्याची भूमिका घेते. पंतप्रधान मोदींनी तिकडे गेलं पाहिज पण ते तिकडे गेले नाहीत, असे शरद पवार म्हणाले. चीनच्या शेजारील राज्य जपली पाहिजेत असे पवार म्हणाले. देशात वेगळं चित्र निर्माण झालं आहे. त्यासाठी वेगळं काहीतरी केलं पाहिजे. तुमचे दुःख कमी करण्याऐवजी ते वाढेल कसे याकडे सरकारचे लक्ष असल्याचे पवार म्हणाले.

पक्ष फोडण्यसाठी केंद्र सरकार काम करत आहे. त्यांच्या विरोधात आता उभे राहिले पाहिजे. त्यांना धडा शिकवला पाहिजे असेही शरद पवार म्हणाले. त्या रस्त्याने आपण जाऊया आणि देशाला दाखवुया की हे लोकांचे राज्य आहे. याचा निर्धार आपण करु. काही लोकांनी वेगळी भूमिका घेतली. त्याबद्दल मला काही बोलायचं नाही, असेही शरद पवार म्हणाले.

## Change Of Name

I have Change my name from **BRIJWASI GAURAV VINOD** To **BRIJWASI GAURAV VINODKUMAR** Hence for this declaration in future i will be use this name **BRIJWASI GAURAV VINODKUMAR** in future the same name will be used by my children and family.

**Old Name : BRIJWASI GAURAV VINOD**
**New Name : BRIJWASI GAURAV VINODKUMAR**
**Address : Brij Villa, Sai Road, Tirupati Nagar, Arvi, Latur. 413512**

## Change Of Name

I have Change my name from **BRIJWASI VINOD DEVKINANDAN** To **BRIJWASI VINODKUMAR DEVKINANDAN** Hence for this declaration in future i will be use this name **BRIJWASI VINODKUMAR DEVKINANDAN** in future the same name will be used by my children and family.

**Old Name : BRIJWASI VINOD DEVKINANDAN**
**New Name : BRIJWASI VINODKUMAR DEVKINANDAN**
**Address : Brij Villa, Sai Road, Tirupati Nagar, Arvi, Latur. 413512**

## एनएमसीने बदलला निर्णय, आता डॉक्टर फक्त जेनेरिकच नव्हे, तर लिहून देऊ शकणार इतर औषधेही

नॅशनल मेडिकल कमिशन अर्थात एनएमसीने डॉक्टरांना रुग्णांना फक्त जेनेरिक औषधे लिहून देण्याचे आदेश दिले होते. मात्र आता एनएमसीने या निर्णयाला स्थगिती देत आदेशात बदल केला आहे. डॉक्टरांच्या दबावाखाली आल्यानंतर आता डॉक्टर जेनेरिक औषधांव्यतिरिक्त इतर औषधे लिहून देऊ शकतील, असे एनएमसीने म्हटले आहे. एनएमसीच्या निर्णयानंतर तात्काळ बंदी उठवल्यानंतर आता डॉक्टर जेनेरिक औषधे तसेच इतर ब्रँडेड औषधे रुग्णांना लिहून देऊ शकणार आहेत.

एनएमसीने २ ऑगस्ट रोजी आदेश जारी केला होता, त्यानुसार खासगी डॉक्टरांनी रुग्णांना फक्त जेनेरिक औषधे





लिहून द्यावी लागणार होती. एनएमसीच्या या आदेशाला खासगी डॉक्टर आणि इंडियन मेडिकल असोसिएशनने तीव्र विरोध केला होता. इंडियन मेडिकल असोसिएशन आणि फेडरेशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स असोसिएशनने या प्रकरणी केंद्र सरकारशी चर्चा केली आणि केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांनीही या विषयावर चर्चा केली, त्यानंतर एनएमसीने आपला निर्णय मागे घेतला.

डॉक्टरांच्या विरोधानंतर एमएमसीने आपला निर्णय बदलला आहे. भारतातील जेनेरिक औषधांचा दर्जा चांगला नसल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. त्याचा वापर करून रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. मी तुम्हाला सांगतो, जेनेरिक औषध कोणत्याही ब्रँडेड औषधापेक्षा स्वस्त आहे. यासाठी रुग्णांना कमी खर्च करावा लागतो आणि त्यामुळे आरोग्यावरील खर्चही कमी होतो.

ठझच् रेग्युलेशन २०२३ मध्ये डॉक्टरांना जास्त काळजी घेण्यास सांगण्यात आले आहे. विशेष म्हणजे, ब्रँडेड जेनेरिक औषधे म्हणजे ज्यांचे पेटंट कालबाह्य झाले आहे किंवा ज्यांचे पेटंट संपले आहे. हे ब्रँड नावाने बाजारात विकले जाते. ही औषधे कोणत्याही पेटंट औषधापेक्षा कमी खर्चिक असतात. ब्रँडेड औषधे महाग असल्याने जेनेरिक औषधांबाबतही महापालिकेचा निर्णय होता. गरीब व्यक्ती ब्रँडेड औषधांनी उपचार घेऊ शकत नाही. त्यामुळेच जेनेरिक औषधांना मान्यता देण्यात आली.

## पुढील महिन्यात १७ दिवस बंद राहतील बँका

तुमच्याकडे अजूनही २००० ची नोट असल्यास ती लवकर बदलून घ्या. कारण या नोटा बदलून देण्याची अंतिम मुदत जवळ येत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने २००० च्या नोटा बदलण्यासाठी ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत वेळ दिला आहे. मात्र, दरम्यान, पुढील महिन्यात १७ दिवस बँका बंद राहणार असून बँका केवळ १३ दिवसच सुरू राहणार आहेत. अशा परिस्थितीत जर तुम्हाला नोटा बदलायच्या असतील तर त्या लवकरात लवकर बदलून घ्या, अन्यथा तुम्हाला




नंतर अडचणीला सामोरे जावे लागू शकते. सप्टेंबरमध्ये बँका किती दिवस बंद राहणार आहेत ते जाणून घ्या.

भारतात काही दिवसात सणासुदीला सुरुवात होणार आहे, सप्टेंबर महिन्यात बँकांना भरपूर सुट्ट्या आहेत. या महिन्यात कृष्ण जन्माष्टमी, गणेश चतुर्थी, ईद-ए-मिलाद यामुळे अनेक दिवस बँका बंद राहणार आहेत. अशा स्थितीत या महिन्यात बँकेशी संबंधित कोणतेही महत्त्वाचे काम असेल तर सुट्ट्यांची यादी पाहूनच नियोजन करा, अन्यथा तुम्हाला नंतर खूप त्रास सहन करावा लागू शकतो. पुढील महिन्याच्या बँक सुट्ट्यांची यादी जाणून घ्या-

सप्टेंबरमध्ये इतके दिवस बंद राहणार बँका

६ सप्टेंबर : श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त बँकेला सुट्टी

७ सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: जन्माष्टमी (श्रावण वद-८) / श्री कृष्ण अष्टमी

१८ सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: वर्षसिद्धी विनायक व्रत/विनायक चतुर्थी

१९ सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: गणेश चतुर्थी/संवत्सरी (चतुर्थी पक्ष)

२० सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: गणेश चतुर्थी (दुसरा दिवस) / नुखाई

२२ सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: श्री नारायण गुरु समाधी दिन

२३ सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: महाराजा हरिसिंह यांचा जन्मदिन

२५ सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: श्रीमंत शंकरदेव यांची जयंती

२७ सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: मिलाद-ए-शरीफ (प्रेषित मुहम्मद यांचा जन्मदिवस)

२८ सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: ईद-ए-मिलाद/ईद-ए-मिलादुन्नबी - (प्रेषित मुहम्मद यांचा जन्मदिवस) (बारा वफत)

२९ सप्टेंबर रोजी बँक सुट्टी: ईद-ए-मिलाद-उल-नबी नंतर इंद्रजात्रा/शुक्रवार.

साप्ताहिक सुट्टी

३ सप्टेंबर : रविवार

९ सप्टेंबर : दुसरा शनिवार

१० सप्टेंबर : दुसरा रविवार

१७ सप्टेंबर : रविवार

२४ सप्टेंबर : रविवार

# इलेक्ट्रॉनिक्स 'ब्रेन चिप': कृत्रिम बुद्धिमत्तेला लगाम!

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता हे स्वत: चेतनामय बनले तर मानवजातच नष्ट होण्याचा धोकाही आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हेच 'चेतना'मय झाले तर होणार्या धोक्यांबद्दल काय करायचे? म्हणूनच हा धोका कमी करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) सिस्टिमला मर्यादित स्वातंत्र्य देत लगाम घालणेदेखील गरजेचे आहे, हा विचार आता जगभर सुरू आहे. इलेक्ट्रॉनिक्स 'ब्रेन चिप' टेक्नोलॉजी हे 'सत्वगुणी ह्युमनाइड कोबोट' आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय)द्वारे मानवाची जागा घेण्याच्या धोक्याबद्दल निर्माण होणारी चिंता कमी करण्यास हे मदत करते.

'बायोट्रोनिक्स' म्हणजे मानवी शरीराचे इलेक्ट्रॉनिक्स अद्भुत आहे. अविश्र्वसनीय वाटावे अशा करामती मानवी शरीरात वाहणारी विद्युतधारा म्हणजे सूक्ष्म करंट घडविते. याच शरीरातील विद्युत प्रवाहाला हवेतसे बदल करीत मानवी मेंदूवर बाहेरून म्हणजे 'रिमोट कंट्रोल' आता शक्य झाले आहे. भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे रजोगुणी व तपोगुणी मानवी शरीराच्या अनेक मर्यादा आहेत. इलेक्ट्रॉनिक्स 'ब्रेन चिप' टेक्नोलॉजी हे 'सत्वगुणी ह्युमनाइड कोबोट (कोलॅबरेटिव्ह रोबोट)' आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय)द्वारे मानवाची जागा घेण्याच्या धोक्याबद्दल निर्माण होणारी चिंता कमी करण्यास हे मदत करते.

डिमांडप्रमाणे हवी तशी फिचर्स व कॅरेक्टर्स असलेली कस्टमायझेशन स्मार्ट मुले कदाचित नजीकच्या काळात लॅबमध्ये फॅब्रिकेट होत तुमच्या घरापर्यंत ऑनलाईन ऑर्डर देत सप्लाय होतील. आज वैद्यकीय कारणांसाठी मिळालेली मानवी मेंदूवरील 'ब्रेन चिप रोपण प्रयोग' परवानगी उद्या कोणती दिशा घेईल व कोणते रंग उधळत तिची दशा काय होईल हे आत्ताच सांगणे कठीण आहे. ह्युमन एआय सिम्बायोसिस तसेच 'इलेक्ट्रॉनिक्स ब्रेन चिप टेक्नोलॉजी'मुळे अमरत्वाच्या दिशेने मानवी सभ्यतेचा प्रवास हा 'मरावे परी डाऊनलोड रूपी उरावे!' असाच असणार आहे, हे मात्र निश्र्चित!

येत्या काळात 'सांग सांग भोलानाथ भारतातही मेंदूत चिप बसेल का? मंगळावरती जायला प्राध्यापक-शिक्षकांनादेखील कायमचीच सुट्टी मिळेल का?' अशी गाणी तुम्हाला ऐकायला आवडेल का? शाळा-महाविद्यालयात ज्ञानार्जनासाठी जाण्याची गरजच उरणार नाही, कारण इलेक्ट्रॉनिक्स 'ब्रेन चिप' टेक्नोलॉजी हे नजीकचे वास्तव घराघरात पोहचणार आहे, हे तुम्हाला ठाऊक आहे का?

### 'इलेक्ट्रोएन्सेफॅलोग्राम'च्या पुढे

'बायोट्रोनिक्स' म्हणजे मानवी शरीराचे इलेक्ट्रॉनिक्स अद्भुत आहे. मेंदूच्या पेशी विद्युत आवेगांद्वारे संवाद साधतात आणि झोपेत असतानाही त्या नेहमी सक्रिय असतात. 'ब्रेन चिप' च्या उगमाची सुरुवात फार जुनी आहे. आजपासून ९९ वर्षांपूर्वी जर्मन मानसोपचारतज्ज्ञ हॅन्स बर्गर यांनी त्यांच्या वयाच्या ५१ व्या वर्षी म्हणजे सन १९२४ मध्ये सर्वप्रथम मानवी ईईजीवर नोंदी घेत मेंदूचा अभ्यास केला. ईईजी म्हणजे इलेक्ट्रोएन्सेफॅलोग्राम ही मेंदूची माहिती घेण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रात वापरली जाणारी एक चाचणी आहे. ईईजी मेंदूच्या विद्युत सिग्नलची नोंद घेते. अपस्मार आणि झोपेच्या विकारांचे निदान करण्यात मदत करण्यासाठी डॉक्टर ईईजी वापरतात. ईईजीमध्ये साधारणतः ६४ किंवा अधिक इलेक्ट्रोडचा वापर केला जातो, मात्र इलेक्ट्रोएन्सेफॅलोग्राम'च्यापुढे वाटचाल करीत थेट मेंदूलाच इलेक्ट्रॉनिक्सच्या तालावर नाचविले जाणार आहे, नव्हे जात आहे, अशी 'ब्रेन चिप' बनली आहे.

### अशी आहे इलेक्ट्रॉनिक्स 'ब्रेन चिप'!

ट्विटर, स्पेसएक्स, टेस्ला आणि असंख्य कंपन्यांचा मालक आणि जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती अशी ख्याती असलेल्या एलॉन मस्कची अजून एक कंपनी आहे 'न्यूरोलिंक'! या न्यूरोलिंकची स्थापना २०१६ मध्ये झाली, मात्र त्याआधीपासून सुरू असलेले इलेक्ट्रॉनिक्स ब्रेन चिप बनविण्याचे असंख्य प्रयोग अयशस्वी झालेत, मात्र एकामागून एक अपयशानंतर आणि असंख्य उंदीर, मेंढ्या, माकडं, डुकरं हे 'गिनीपिग' प्रयोगातून यमसदनी गेल्यावर आता 'ब्रेन चिप' प्रयोग यशस्वी झाले. ब्लूटुथ टेक्नोलॉजीने २०२१ माकडावर प्रयोग केला गेला आणि ही 'ब्रेन चिप' मिळाल्यानंतर ९ वर्षांचे माकड अक्षरशः व्हिडीओ गेम खेळू लागले. जर माकडाला प्रयोग यशस्वी होऊ शकतो तर माणसांवरदेखील ते शक्य आहे, पण अडचण होती अशा प्रयोगाच्या परवानगीची आणि आता तो मार्गही मोकळा झाला आहे.

मे २०२३ मध्ये अमेरिकेतील सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यासाठी जबाबदार असलेल्या फूड अँन्ड ड्रग एडमिनिस्ट्रेशन (एफडीआय)ने ह्यूमन क्लिनिकल स्टडी ट्रायलला परवानगी दिली आहे. म्हणजे आता थेट मानहानीचा 'गिनीपिग' बनवत माणसांवर प्रयोगशाळेत 'ब्रेन चिप' बसविली जाणार! मानवी मेंदूत सिलिकॉनची इलेक्ट्रॉनिक्स 'ब्रेन चिप' म्हणजे आयसी (इंटिग्रेटेड सर्किट) बसविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### स्पर्धा 'ब्रेन चिप'ची!

एलॉन मस्क हे एकटेच 'इलेक्ट्रॉनिक्स ब्रेन चिप टेक्नोलॉजी' बनवित नाहीत, तर त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी मायक्रोसॉफ्टचे सह-संस्थापक बिल गेट्स आणि ॲमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस हेदेखील आहेत. त्यांनीदेखील 'सिंक्रोन' या मेलबर्न, ऑस्ट्रेलियामध्ये मुख्यालय असलेल्या कंपनीत गुंतवणूक केली आहे. यापूर्वीच 'सिंक्रोन' या कंपनीने मेंदू-संगणक इंटरफेसची (बीसीआय) चाचणी मानवांमध्ये केली आहे.

### वैद्यकीय क्षेत्रात फायदे!

वैद्यकीय क्षेत्रात या 'ब्रेन चिप'ची किमया हा मोठा फायदा होणार आहे. ब्रेन डिसऑर्डर, अर्धांगवायू, मणक्याचे आजार, मूक, कर्णबधिर, अंधव्यक्तींनाही पाहता येण्यासाठी रुग्णांना 'इलेक्ट्रॉनिक्स ब्रेन चिप टेक्नोलॉजी'चा माऊस, मोबाईल, लॅपटॉप यांसारख्या डिजिटल उपकरणांचा वापर करीत सहाय्यभूत उपयोग होणार आहे.

### न्यूरोलिंक १

'न्यूरोलिंक १' हा मानवी मेंदूत 'ब्रेन चिप' इम्प्लांट करण्याचा प्रोजेक्ट आहे. सर्जिकल रोबोट चार वापर करीत केसांच्या आकाराचे छिद्र मानवी कवटीला पाडून मानवी मेंदूत प्रत्यक्षात अनेक इलेक्ट्रॉनिक्स 'ब्रेन चिप्स' बसविल्या जातील. 'ब्रेन चिप'मध्ये लहान आणि लवचिक इलेक्ट्रोड 'थ्रेड्स' म्हणजे धाग्यांची रांग म्हणजे अँरे वापरलेले आहेत. मानवी मेंदूतील 'न्यूरॉन्स'शी संलग्न होत या इलेक्ट्रॉनिक्स चिपमधील धागे संदेशवहन करतील. 'न्यूरोलिंक १' मध्ये ९६ थ्रेड्समध्ये ३०७२ इलेक्ट्रोडचा वापर असलेली 'ब्रेन चिप' ही थेट मेंदूबरोबर संदेश वहन व संवाद करीत मेंदू व शरीरातील अवयव वापरासाठी करता येणार आहे.

एक वायरलेस बॅटरी या सर्वांना 'पावर' देणार आहे. मोठ्या नाण्याच्या आकाराच्या उपकरणामध्ये हवाबंद इलेक्ट्रॉनिक्स सर्किटचा समावेश असेल. न्यूरोलिंकच्या फर्स्ट जनरेशन टेक्नोलॉजीतील 'ब्रेन चिप' मध्ये १०२४ इलेक्ट्रोड होते, मात्र आता नवीन 'एडव्हान्स्ड व्हर्जन' मध्ये इलेक्ट्रोडची संख्या १६ हजारांपेक्षा जास्त असणार आहे, जे एक क्रांतिकारी पाऊल असेल. न्यूरालिंकचे पहिले उत्पादन 'लिंक' हे घराघरातील लोकांना



त्यांच्या मनात विचार येताक्षणी संगणक किंवा मोबाईल डिव्हाईस नियंत्रित करता येईल या हेतूने बनविले जात आहे.

### एवढा खटाटोप कशासाठी?

'स्पेसएक्स' या खासगी अंतराळ कंपनीतर्फे रियुजेबल रॉकेट निर्मिती सुरू केली. 'स्टारलिंक' तर्फे अल्प दरात, वेगवान व कमी विलंबाने कम्युनिकेशन करणारी जागतिक सॅटेलाईट इंटरनेट सेवा सुरू केली आहे. टेस्ला मानवरहीत वाहन निर्मिती करीत आहे. ओपन एआयतर्फे आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) च्या माध्यमातून जगभरातील ज्ञानसाठा आणि मानवी संवाद वर्तणूक जाणून घेण्यासाठी 'ट्विटर' अशा एलॉन मस्कच्या विविध कंपन्यांचा एकत्र विचार केला, तर स्पष्टपणे लक्षात येते की, हा सर्व खटाटोप पृथ्वीवरून परग्रहावर स्वारी करीत मानवी वस्ती स्थापित करण्यासाठी आहे.

### मंगलमय दूरदृष्टीतील 'मंगळ'!

पृथ्वीवरील लोकसंख्या ८ अब्जाच्या पलीकडे गेली आहे आणि एक तृतीयांश लोकसंख्येपेक्षा जास्त लोक हे रोज अन्नधान्याच्या व शुद्ध पेयजलाच्या अभावी उपाशीपोटी तडफडत आहेत. या प्राथमिक गरजांवर तातडीने जागतिक एकत्रित स्तरावर उपाययोजना करीत अन्नसुरक्षा व पेयजल उपलब्ध न केल्यास पृथ्वीवर माजणारी अराजकता ही लवकरच नियंत्रणाबाहेर असेल. अशावेळी पृथ्वीवरून 'ग्रहांतरा'साठी मंगलकारी ग्रह कोणता? तर मंगलमय दूरदृष्टीतील मंगळ हाच होय!

### मानवी मर्यादांवर मात!

मंगळावरील वातावरणात ९६ टक्के कार्बनडायऑक्साईड आहे. ४ एप्रिल २०२२ रोजी नासा या अमेरिकन संशोधन संस्थेने मंगळावर पाठविलेल्या 'मॉक्सी १८' म्हणजे 'मार्स ऑक्सिजन इन सितू रिसोर्स युटिलायझेशन एक्सपेरिमेंट' ही एखाद्या टोस्टरसारखी लहान यंत्रणा पाठविली. 'मॉक्सी १८' या उपकरणात एका फ्यूएल सेलमधून विद्युतप्रवाह ७९८.९ अंश सेल्सिअसला प्रवाहित करीत कार्बन मोनॉक्साईड आणि ऑक्सिजनच्या अणूंना वेगळे करण्यात यश मिळविले आहे. ताशी १०.४ ग्रॅम म्हणजे एक लहान झाड दीड वर्षात जेवढा प्राणवायू निर्माण करते इतका ऑक्सिजन 'मॉक्सी १८' देते आहे.

धूळ, मातीमध्ये सेंद्रिय कार्बन व उपयुक्त सूक्ष्मजीवांचा अभाव असलेला ग्रह म्हणजे मंगळ! मात्र याच मंगळावरील खारट पाणी हे समुद्री जीवाणूंच्या मदतीने शुद्ध करणे शक्य आहे. तसेच मंगळावरील ज्वालामुखीच्या कणखर व कमी पोष्टिकता असलेल्या जमिनीवर एल्फाल्फा, शलगम, मुळा आणि सलाडची पाने उगवत शेतीने अन्ननिर्मितीसाठीदेखील नासाने योजना बनविली आहे.

मात्र अन्न, प्राणवायू उपलब्ध झाले तरी भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे रजोगुणी व तपोगुणी मानवी शरीराच्या अनेक मर्यादा आहेत. अपूर्ण इंद्रिये, मोह व लोभाच्या आहारी जात फसविण्याची वृत्ती, चंगळवादी मनोवृत्ती, काम, क्रोध व मद म्हणजे धुंद होणे यामुळे भ्रमित होणे तसेच चुका करणे अशा या मर्यादांवर मात करण्यासाठी सुयोग्य उपाययोजना आवश्यक आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि स्केलेबल हाय-बँडविड्थ ब्रेन मशीन इंटरफेस (बीएमआय) सिस्टमच्या दिशेने 'न्यूरालिंक'चे पहिले पाऊल हा यावर उपाय आहे, जे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

मंगळावर पाठविलेल्या मनुष्य प्राण्याला तेथील वातावरणात समस्यांशी मुकाबला करण्यासाठी सामर्थ्य प्रदान करीत पृथ्वीवरून मंगळावरील मानवाचे थेट मेंदू नियंत्रण करण्यासाठी 'न्यूरालिंक' ही कंपनी काम करीत आहे. 'न्यूरालिंक'चा उद्देशच मुळी मानवी मेंदूला संगणकाशी थेट वायरलेस व दूरसंवाद साधण्यास सक्षम करणे असा आहे. मंगळ ग्रहावर लोकवस्ती करीत असताना तेथे पाठविलेल्या माणसांना थेट 'टेलिपॅथी'ने कंट्रोल करीत त्यांच्या अडचणी सोडविणे यामुळे अगदी सहज शक्य होणार आहे.

### चेतना

पृथ्वीवर सजीवसृष्टी ही परग्रहवासीयांनी निर्माण केलेली नाही, असे गृहीत धरून मानवी सभ्यता ही संवेदनशील किंवा चेतनामय बनली तर प्रयोगशाळेतदेखील चेतना निर्माण करता येईल. त्यासाठी कुठल्याही एलियनची गरज नाही, तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) मुळे हे अगदी सहजपणे शक्य आहे.

मानवी शरीरात चेतना किंवा पंचप्राण म्हणजे प्राण, अपान, व्यान, उदान और समान हे नेमके कुठल्या बिंदूवर व कसे सुरू होतात हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अनेकदा पडणार्या या प्रश्नाचे उत्तर जवळपास आता सापडले आहे. क्वांटम म्हणजे कण आणि लहरी म्हणजे वेव्ह यांच्या अभ्यासातून चेतना कोठून सुरू होते हे आता कळले आहे. आपण एका पेशीपासून सुमारे ३५ ट्रिलियन (लाख कोटी म्हणजे एकावर बारा शून्य) पेशींपर्यंत प्रगती करीत शरीर धारण करताना यांचे उत्तर मिळाले आहे. जर स्टँडर्ड कॉम्प्युटर मॉडेल बरोबर असेल, तर क्वार्क आणि लेप्टॉन्स सुरुवातीपासून सुमारे १३८ लाख वर्षांनंतर जागरूकता निर्माण होत मानवी शरीर चेतना धारण करते. याचमुळे अन्नसुरक्षेचा धोका आणि वाढलेल्या लोकसंख्येवर उपाय शोधताना 'मंगळा'सारख्या ग्रहावर 'ग्रहांतर' ही अपरिहार्य अत्यावश्यक गरज बनलेली असतानाच 'एआय'चा सुयोग्य वापर गरजेचा आहे. तसेच पृथ्वीवरील उपद्रवी मेंदूंचा सोशल मीडियाच्या माध्यमातून शोध घेत 'मेंदू नियंत्रण' हे पाऊलदेखील आवश्यक आहे.

### 'एआय'ची दुधारी तलवार!

मात्र आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे स्वतः चेतनामय बनले, तर मानवजातच नष्ट होण्याचा धोकाही आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हेच 'चेतना'मय झाले, तर होणार्या धोक्यांबद्दल काय करायचे? म्हणूनच हा धोका कमी करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) सिस्टिमला मर्यादित स्वातंत्र्य देत लगाम घालणेदेखील गरजेचे आहे, हा विचार आता जगभर सुरू आहे. इलेक्ट्रॉनिक्स 'ब्रेन चिप' टेक्नोलॉजी हे 'सत्वगुणी ह्युमनाइड कोबोट' आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय)द्वारे मानवाची जागा घेण्याच्या धोक्याबद्दल निर्माण होणारी चिंता कमी करण्यास हे मदत करते.

### मरावे परी डाऊनलोड रूपी उरावे!

भारतात बंगलोर येथे ४०० पेक्षा जास्त मेंदू 'न्यूरोपॅथॉलॉजी ब्रेन म्युझियम-निम्हान्स' येथे जतनासाठी ठेवले आहेत. भविष्यात मनुष्य जिवंत होईल या आशेवर 'क्रायोनिक्स' प्रकल्पांतर्गत ऑस्ट्रेलियातील 'सदर्न क्रायोजनिक्स' ही कंपनी कार्यरत आहे. सध्या ही कंपनी द्रवरूप नायट्रोजनच्या स्टिल चेंबूरमध्ये ऊणे २०० अंश सेल्सिअस तापमानात १ कोटी रुपये आकारत ६०० मृतदेहांच्या 'ममी' त्यांच्या मेंदूसह जतन करण्यासाठी गोदाम बांधत आहे.

आता ज्ञान व अनुभव तसेच मानवी संवेदनादेखील डाऊनलोड करून ठेवत मनुष्य अमरत्व प्राप्त करू शकेल. इतकेच नव्हे तर तुमचे शरीर मृत झाल्यानंतरदेखील 'चेतना' म्हणजे 'कॉन्शियसनेस' तुमच्या नातलगांशी गप्पा मारत त्यांना मार्गदर्शन करू शकेल. आज वैद्यकीय कारणांसाठी मिळालेली मानवी मेंदूवरील 'ब्रेन चिप रोपण प्रयोग' परवानगी उद्या कोणती दिशा घेईल व कोणते रंग उधळून तिची दशा काय होईल, हे आत्ताच सांगणे कठीण आहे. ह्युमन एआय सिम्बायोसिस तसेच 'इलेक्ट्रॉनिक्स ब्रेन चिप टेक्नोलॉजी'मुळे अमरत्वाच्या दिशेने मानवी सभ्यतेचा प्रवास हा 'मरावे परी डाऊनलोड रूपी उरावे!' असाच असणार आहे, हे मात्र निश्र्चित!

**- प्रा. किरणकुमार जोहरे**

## दुष्काळाची चाहूल, पाण्याचा ताळेबंद आखून शेतकऱ्यांनी पावलं टाकवीत; पोपटराव पवारांचं आवाहन

मुंबई : सध्या राज्यात पावसानं दडी मारल्याचं चित्र आहे. त्यामुळं राज्यातील शेतकरी चिंतेत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांनी दुष्काळाची चाहूल लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचा ताळेबंद आखून पुढील पावलं टाकणं गरजेचं असल्याचं मत आदर्श गाव हिवरे बाजारचे कार्याध्यक्ष पोपटराव पाटील यांनी व्यक्त केलं. राज्य सरकारनं आतापासूनच शेतकऱ्यांच्या जनावरांच्या चाऱ्याबाबत नियोजन करणं गरजेचं असल्याचीही सूचना त्यांनी केली आहे.

सध्या राज्यातील अनेक भागात पावसानं ओढ दिली आहे. त्यामुळं खरिपाचं पीक वाया जाण्याची भीती आहे. पावसानं ओढ दिल्याचा परिणाम दुग्ध व्यवसायावरही झाल्यानं शेतकरी अडचणीत सापडण्याची शक्यता पोपटराव पवार यांनी व्यक्त केली. पावसाच्या या पार्श्र्वभूमीवर १०० टक्के पीक वाचवण्यासाठी प्रयत्न न करता काही पीक सोडून द्यावं लागेल असे पवार म्हणाले. पिण्याचं पाणी, जनावरांच्या चारा पिकासाठीचं पाणी आणि फळबागा वाचवण्यासाठी लागणारं पाणी याला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे पोपटराव पवार यांनी सांगितलं. सरकारनं आतापासूनच शेतकऱ्यांच्या जनावरांच्या चाऱ्याबाबत नियोजन करणं गरजेचं आहे. ही खबरदारी न घेतल्यास, जनावरांच्या चाऱ्याच्या किंमती ऐनवेळी गगनाला भिडतील अशी भीती पोपटराव पवारांनी व्यक्त केली आहे.



राज्यात पावसानं दडी मारल्यानं बळीराजा चिंतेत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्या सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. मराठवाड्यासह पश्र्चिम महाराष्ट्रातील अने जिल्हे तहानलेलेच आहेत. विदर्भातील काही जिल्हे आमि कोकणात काही प्रमाणात पावसानं हजेरी लावली आहे. मात्र, अन्य भागात पावसानं दडी मारल्याचं चित्र दिसत आहेत. त्यामुळं हातची पीकं वाया जाण्याची भीती निर्माण झालीय. त्यामुळं राज्यात पाणी टंचाईचं संकट येण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. पाणीटंचाईचं संकट आल्यास शेतकऱ्यांच्या पिकांबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्र्न देखील उद्भवण्याची शक्यता आहे. त्यामुळं या संकटापूर्वीच शेतकऱ्यांमी पाण्याचं आणि चाऱ्याचं योग्य ते नियोदन करणं गरजेचं आहे. जूनमध्ये पावसानं दडी मारली होती. त्यानंतर जुलै महिन्यात काही प्रमाणात पावसानं हजेरी लावली. मात्र, या चालू ऑगस्ट महिन्यात पावसानं चांगीच दडी मारली आहे.

पावसाच्या या स्थितीमुळं शेतकऱ्यांची मका, कापूस, सोयाबीन, मूग , बाजरी, तूर पीकं करपू लागली आहेत. खरिपाचा पूर्ण हंगाम वाया जाण्याची शेतकऱ्यांना भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केलीय.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## एका दिवसात किती खाव्यात चपात्या, माहित आहे का याचे उत्तर ?



गव्हाची चपाती हा आपल्या आहाराचा महत्त्वाचा भाग मानला जातो. गव्हाच्या चपातीमध्ये कॅल्शियम आणि प्रथिने मुबलक प्रमाणात आढळतात. याशिवाय गव्हाच्या चपातीमध्ये अनेक पोषक तत्व आढळतात, जे आपल्या शरीरात ऊर्जा टिकवून ठेवतात. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की एका दिवसात किती चपात्या खाव्यात.

बाजरी आणि ज्वारीच्या भाकऱ्या खाल्ल्या जात असल्या तरी, बहुतेक भारतीय घरांमध्ये गव्हाची चपातीच खाण्याची प्रथा आहे. या लेखात आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की एका दिवसात किती चपाती खावी आणि महिनाभर गव्हाची चपाती सोडल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होतो. जाणून घेऊया.

**किती खाव्यात गव्हाच्या चपात्या**

सामान्यतः गव्हाच्या पिठापासून बनवलेल्या चपातीमध्ये सुमारे १२० कॅलरीज असतात. अशा स्थितीत महिलांनी दोनच चपात्या आणि पुरुषांनी सकाळी तीन चपात्या खाव्यात, असे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तर रात्रीच्या जेवणाच्या वेळी तुम्ही तुमच्या गरजेनुसार चपात्या खाऊ शकता. तथापि, ३ किंवा ४ पेक्षा जास्त चपात्या पचण्यात मोठ्या समस्या असू शकतात.

**१ महिना चपाती खाल्ली नाही तर ?**

तुम्ही कधी विचार केला आहे का की जर तुम्ही महिनाभर गव्हाची चपाती खाल्ली नाही, तर शरीरात काय बदल होतील ? आरोग्य तज्ज्ञांच्या मते, तुम्ही चपाती खाणे पूर्णपणे सोडून देऊ शकता असे नाही. तथापि, आपण निश्चितपणे चपातीचे सेवन थोडे कमी करू शकता. जे लोक वजन कमी करण्याच्या प्रवासात आहेत, ते चपातीऐवजी हिरव्या भाज्यांची कोशिंबीर खाऊ शकतात. गव्हाची चपाती खाल्ल्याने शरीरात कार्बोहायड्रेट्स आणि ग्लूटेनचे प्रमाण वाढल्याने चरबी जमा होण्यास सुरुवात होते. याशिवाय गव्हाची चपाती जास्त खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढते. गव्हात कार्बोहायड्रेट आढळते. त्यामुळे रक्तदाब वाढण्याची समस्या उद्भवू शकते. चपाती शरीराला ऊर्जा देत असल्याने ती पूर्णपणे सोडून देण्याऐवजी कमी करता येते.

## पॅन्टच्या मागच्या खिशात पर्स ठेवल्याने होऊ शकतो हा आजार, डॉक्टरांनी दिला असा इशारा

जर तुम्हालाही पॅन्टच्या मागच्या खिशात पर्स ठेवण्याचा शौक असेल, तर आतापासूनच काळजी घ्यायला हवी. एखाद्या दिवशी हा छंद तुमच्या आरोग्याला भारी पडू शकतो. वास्तविक, या छंदामुळे लोक फॅट वॉलेट सिंड्रोमला बळी पडत आहेत. त्यात तरुणांची संख्या मोठी आहे. सततचे रिपोर्ट्स पाहून डॉक्टरही आता लोकांना हा छंद न पाळण्याच्या सूचना देत आहेत.

डॉक्टरांच्या मते, पॅन्टच्या मागच्या खिशात पर्स ठेवण्याची सवय तुमच्या नितंबांना खराब करू शकते. खरं तर, तरुणांची ही सवय आहे की ते महत्त्वाच्या कागदपत्रांपासून ते पैशांपर्यंत आणि सर्व एटीएम आणि क्रेडिट कार्ड त्यांच्या पाकिटात ठेवतात. अशावेळी पर्स खूप जाड होते. आणि जेव्हा लोक पर्स पॅंटच्या खिशात ठेवून बसतात, तेव्हा त्याचा दाब नितंबावर पडतो आणि नितंब वर येते.

यामुळे नितंबांचे संतुलन बिघडते आणि लोक फॅट वॉलेट सिंड्रोमच्या विळख्यात येतात. हळूहळू हा सिंड्रोम लोकांना सायटिकासारख्या गंभीर आजाराकडे ढकलतो. याशिवाय नितंब सुन्न होण्याची शक्यताही बळकट होते. याबाबत ऑर्थोपेडिक सर्जनच्या म्हणण्यानुसार, आजकाल अशा प्रकारची समस्या घेऊन येणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे.

त्यामध्ये नोकरदार तरुणांची संख्या अधिक आहे. त्यांनी सांगितले की, साधारणपणे एका




जागी बराच वेळ बसून काम करणारे लोक जास्त असतात. आता त्याचे पाकीट पॅन्टच्या मागच्या खिशात ठेवलेले असल्याने त्यांना या समस्येला सामोरे जावे लागते. या प्रकारची समस्या मुख्यतः विद्यार्थी, बँकर्स, ड्रायव्हर आणि डेस्क कामगारांमध्ये गुंतलेली आहे.

त्यांनी सांगितले की जर तुम्हाला हा आजार टाळायचा असेल, तर तुम्हाला तुमचे पाकीट तुमच्या मागच्या खिशात ठेवणे टाळावे लागेल. पॅंटच्या मागच्या खिशात पाकीट ठेवण्याची सक्ती असेल तर खूप पातळ ठेवण्याचा प्रयत्न करा, असे सांगून डॉक्टरांनी या समस्येवर उपायही सुचवला की, पाकिटात ठेवलेल्या बहुतांश गोष्टी आता मोबाईल मध्ये देखील डिजिटल स्वरूपात ठेवले जाऊ शकते.

## चाळीशी पार केलेल्या महिलांसाठी अँटी एजिंग टीप्स



जसेजसे आपण वयाच्या ४० मध्ये पाऊल ठेवतो तेव्हा आपल्या त्वचेत हार्मोनल आणि कोलेजन उत्पादनाच्या कमतरतेमुळे महत्त्वपूर्ण बदल होतात. मात्र स्किनची योग्य काळजी घेतल्यास आणि हेल्दी लाइफस्टाइलमुळे स्किन एजिंगची समस्या नियंत्रणात ठेवू शकतो. पुढील काही अँन्टी एजिंग टीप्सच्या तुमच्या नक्की कामी येतील.

**स्किन क्लिजिंगला प्राथमिकता**

स्वच्छ, चमकदार त्वचा हवी असेल तर नियमित क्लीजिंग करा. हयालूरोनिक ॲसिड किंवा सेरामाइड्स असणारे प्रोडक्ट्स वापरा ज्यामुळे त्वचेवर ओलसरपणा राहिल.

**एक्सफोलिएशन**

आपल्या स्किननुसार स्क्रब निवडा. मात्र तो अधिक कठोर नसावा. स्क्रबमुळे डेड स्किन सेल्स दूर होतात आणि स्किनला ग्लो येतो.

**मॉइश्चराइजर**

वयाच्या चाळीशीत त्वचेवरील ओलसरपणा कमी होऊ लागतो. त्यामुळे त्वचेला मॉइश्र्चराइज करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे चेहरा धुतल्यानंतर आपल्या स्किनला मॉइश्र्चराज करणे विसरु नका.

**हेल्दी लाइफस्टाइल**

अँन्टी एजिंग रुटीनचा अर्थ असा होतो की, केवळ ब्युटी प्रोडक्ट्सपर्यंत मर्यादित राहत नाही. खुप पाणी प्या, संतुलित आहार घ्यावा, प्रोसेस्ड फूड पासून दूर रहावे आणि नियमित रुपात व्यायाम करावा.

**पुरेशी झोप घ्या**

त्वचा अशावेळी ग्लो करते जेव्हा आपला मेंदू आणि शरिर रिलॅक्स राहतो. त्यासाठी तणावापासून दूर रहा आणि दररोज कमीत कमी आठ तासांची पुरेशी झोप घेण्यास विसरु नका.

**डोळ्यांची काळजी**

वयाच्या चाळीशीपर्यंत सुरकुत्या आणि सूज येण्याचा धोका असतो. यापासून दूर राहण्यासाठी पेप्टाइड्स, हायलुरोनिक ॲसिड आणि अँन्टीऑक्सिडेंटयुक्त आय क्रिम किंवा सीरमचा वापर करू शकता.

**उन्हापासून दूर रहा**

वेळेआधी अँन्टी एजिंगच्या समस्येपासून दूर राहण्यासाठी स्किनला हानिकारक युवी किरणांपासून दूर ठेवणे अत्यंत गरजेचे असते. कमीत कमी ५० डझ्रऋ असणारे ब्रॉड-स्पेक्ट्रम सनस्क्रिन घराबाहेर पडण्यापूर्वी जरुर लावा.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे वय वाढणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यामुळे नाराज होण्याऐवजी ॲक्टिव्ह राहून, आनंदित राहून आणि हेल्दी लाइफस्टाइल फॉलो करून तुम्ही आयुष्याची मजा घेऊ शकता.

## घरी मिनरल वॉटर कसे बनवायचे ?

जर तुम्ही आरोग्याबाबत जागरूक असाल आणि आजारांच्या भीतीने बाजारातील मिनरल वॉटर पीत असाल, तर आम्ही तुम्हाला सांगतो की तुम्ही काही सोप्या पद्धतींनी मिनरल वॉटर घरीच तयार करू शकता. त्याची प्रक्रिया अतिशय सोपी आहे. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तुम्हाला घरी बनवलेल्या मिनरल वॉटरचे सर्व फायदे तर मिळतीलच, शिवाय तुमच्या खिशावर पडणाऱ्या अनावश्यक भारापासूनही तुमची बचत होईल. चला तर मग जाणून घेऊया तुम्ही घरी मिनरल वॉटर कसे बनवू शकता.

**घरी मिनरल वॉटर बनवण्याच्या ५ स्टेप्स**

**१. टॅप पाणी फिल्टर करा**

मिनरल वॉटर बनवण्याची पहिली स्टेप म्हणजे नळाचे पाणी फिल्टर करणे. यासाठी तुम्ही तुमचे नियमित वॉटर प्युरिफायर वापरू शकता.

एका भांड्यात एक ते दोन लिटर पाणी ठेवा.

आता हे पाणी वॉटर फिल्टरमध्ये टाका.

आता पाणी पूर्णपणे फिल्टर होऊ द्या.



हे पाणी गाळून झाल्यावर मोकळ्या भांड्यात ठेवा.

हे भांडे पूर्णपणे स्वच्छ आणि कोणत्याही वासापासून मुक्त असावे.

**२. बेकिंग सोडा घाला**

मिनरल वॉटर बनवण्याची पुढची पायरी म्हणजे शुद्ध पाण्यात बेकिंग सोडा टाकणे.

एक लिटर पाण्यात १/८ चमचे बेकिंग सोडा टाका. जर पाणी दोन लिटर असेल तर एक चतुर्थांश चमचे बेकिंग सोडा घ्या. बेकिंग सोडा घातल्याने पाण्यात सोडियम मिसळते. त्यामुळे अपचन, बद्धकोष्ठता, पोट फुगणे, छातीत जळजळ आणि संधिवात यासारख्या समस्या दूर होतात.

**३. रॉक सॉल्ट घाला**

बेकिंग सोडा टाकल्यानंतर, एक लिटर स्वच्छ पाण्यात १/८ चमचे रॉक मीठ घाला. हे जंतूनाशक म्हणून काम करते आणि शरीराला बॅक्टेरियाच्या हल्ल्यापासून वाचवते. हे मीठ आधीच फिल्टर केलेल्या पाण्याची शुद्धता वाढवते.

**४. पोटॅशियम बायकार्बोनेट घाला**

आता स्वच्छ केलेल्या पाण्यात पोटॅशियम बायकार्बोनेट घाला. ते जोडल्याने आपला रक्तदाब संतुलित राहतो. हे खनिज हृदयाच्या आरोग्यासाठीही खूप महत्त्वाचे आहे. यामुळे हृदयविकाराचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. म्हणूनच मिनरल वॉटर बनवण्यासाठी पाण्यात पोटॅशियम बायकार्बोनेट मिसळणे फार महत्वाचे आहे.

**५. सर्व गोष्टी एकमेकांमध्ये चांगले मिसळा**

पाण्यात मिसळलेले सर्व घटक एकमेकांमध्ये मिसळणे फार महत्वाचे आहे. या स्वच्छ पाण्यात सर्वकाही मिसळण्यासाठी तुम्ही सोडा सायफन देखील वापरू शकता. हे कार्बोनेटेड पेये विखुरण्यासाठी वापरले जाणारे उपकरण आहे. हे रिबन आणि हॅंडलसह येते. या रिबनला सायफनशी जोडा. आता या हॅंडलमधून पाणी पास करा. पाणी गेल्यावर हॅंडल दाबा. आता तुमचे मिनरल वॉटर तयार आहे. या पाण्यात सोडियम आणि पोटॅशियम असते, ज्यामुळे तुम्ही अनेक प्रकारचे इन्फेक्शन टाळू शकता आणि तुमची पचनसंस्थाही व्यवस्थित काम करेल.

जर तुम्हाला बाहेरून मिनरल वॉटर आणण्याचा खर्च करायचा नसेल, तर सोडियम बायकार्बोनेट, पोटॅशियम बायकार्बोनेट आणि रॉक सॉल्ट यांसारख्या काही घटकांसह तुम्ही मिनरल वॉटर बनवू शकता. हे मिनरल वॉटर तुम्हाला पचनसंस्थेशी संबंधित अनेक समस्यांपासून वाचवू शकते. परंतु जीवनशैलीशी संबंधित कोणतेही उपाय वापरण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## केसांना मेहंदी लावण्याचे ‘हे’ आहेत फायदे





मेहंदीचा वापर प्राचीन काळापासून केसांचा नैसर्गिक रंग म्हणून केला जात आहे. मेहंदी हे टॅनिन आणि व्हिटॅमिन ईचे नैसर्गिक स्रोत आहे, जे नैसर्गिकरित्या केसांना मऊ करण्यास मदत करते. इतर कोणत्याही प्रॉडक्ट्सच्या तुलनेत हा सर्वोत्तम हेअर मास्क आहे. मेहंदी लावल्यानंतर केसांना सरसोचे तेल लावा आणि दुसऱ्या दिवशी केसांना शॅम्पू करा. यामुळे केसांमध्ये रंग जास्त काळ टिकेल. केसांना मेहंदी लावण्याचे अनेक फायदे आहेत. कोणते ते जाणून घ्या.

केसांना मेहंदी लावल्याने केसांना नैसर्गिक फायदे मिळतात. केसांना नॅचरल चमक येण्यासाठी हर्बल मेहंदी फायदेशीर आहे. मेहंदी हे सर्वोत्तम हेअर मास्क आहे. त्यामुळे महिण्यातून दोनदा तरी केसांना मेहंदी लावावी. केसांना नैसर्गिक एक रंग असतो अशातच जर का तुम्ही केसांना मेहंदी लावली तर त्याला आजून छान रंग येतो. सफेद बालों में नहीं टिकता मेहंदी और डाई का रंग, अजमाएं ये तरीका, लंबे समय तक काले रहेगें बाल

शरीरात असेलेली उष्णता यामुळे सुद्धा केस गळतात यासाठी मेहंदी लावा. मेहंदी तुमच्या केसाला मरून रंग देते तसेच बाहेरच्या रसायन न वापरात हा रंग नॅचरली तुम्हाला मिळतो. जर का तुम्ही हार्ड केमिकल्स केसांना लावलात तर त्याचा परिणाम डायरेक्ट तुमच्या केसांना होतो. मेंदीमध्ये अँटीफंगल गुणधर्म असतात ज्यामुळे केसांना पोषण मिळते. जर का तुमच्या केसात कोंडा असेल तर मेंदीच्या वापरामुळे हा कोंडा कमी होईल. केसाला मेहंदी लावताना मेहंदी पावडरमध्ये दही,अंडी मिसळल्यास त्याचा परिणाम केसांना चांगला मिळतो. मेंदी लावल्याने टाळू शांत राहतो. तसेच जर का टाळूला खाज किंवा डॅन्डरफ असेल तर तो सुद्धा निघून जातो. मेहंदी स्काल्पचा किसंतुलित करते आणि केसांना जास्त ऑइली होण्यापासून रोखते.



## दिवसाची सुरुवात करा थंड पाणी, बदाम खाऊन

आरोग्यपूर्ण राहण्यासाठी दिवसाची सुरूवात थंड पाणी, बदाम आणि व्यायामानं करावी. दिवसभर आपण ताजेतवाने राहाल. एका तज्ज्ञाचं असं म्हणणं आहे. एका फिटनेस सल्ला कंपनीनुसार, चांगल्या आरोग्यासाठी काही खास टिप्स..

सकाळी उठल्याबरोबर अर्धा लिटर थंड पाणी प्या. रिकाम्यापोटी थंड पाणी प्यायल्यानं मेटाबॉलिझम वाढण्यात मदत होते.

रिकाम्या पोटी सहा ते दहा बदाम आणि अक्रोड खावेत, त्यानं इन्झाइम्स तयार होतात आणि पचनक्रिया चांगली होते.

सकाळचा नाश्ता जरा हेवी घ्यावा म्हणजे दिवसभर आपली ऊर्जा टिकून राहते. यात काबरेहायड्रेट आणि प्रोटीन भरपूर असले पाहिजे.

सकाळी थोडा व्यायामही आवश्यक आहे. यामुळं स्नायूंमध्ये लवचिकता राहते. जितकं शक्य असेल तितकं चालावं, यामुळं अधिकच्या कॅलरीज बर्न होण्यास मदत मिळते.

बदाम आणि अक्रोड ऊर्जेचा भंडार आहेत. दिवसभरात थोडे शेंगदाणे खात राहावे. ध्यान आणि विश्रंतीवर लक्ष केंद्रित करावं. यामुळं मानसिक शांती मिळते आणि विचार करण्याची वृत्तीही वाढते.

## Mud Bath थेरपीने होतील ‘हे’ फायदे

आपल्या लाइफस्टाइलमध्ये नैसर्गिक गोष्टींचा वापर करणे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. यामुळे काही समस्या ही दूरहोतात. पृथ्वीवर अशी काही खनिजे आणि पोषक तत्त्व आहेत जे आपल्या शरिराला हेल्दी ठेवण्यास मदत करतात. याच्या मदतीने तुम्ही उत्तम आयुष्य जगू शकता.

अशातच मड थेरपी अशी एक अनोखी थेरपी आहे त्याचा वापर करून काही आजार दूर होऊ शकतात. जागतिक स्तरावर हळूहळू मड थेरपी प्रसिद्ध होऊ लागली आहे. याच्या मदतीने तुम्ही तुमची स्किन उत्तम होण्यासह, त्यावर पडणारे डाग आणि मान्सून दरम्यान रोग ही दूर होतात. अशातच मड बाथचे फायदे जाणून घेऊयात.

**पाचनक्रिया उत्तम होते**

मातीत शरिरातील सर्वाधिक विषारी पदार्थांना अवशोषित करण्याचा गुण असतो. पोटाच्या चारही बाजूला माती लावल्यास तुमची पनचक्रिया सुधारते आणि



तुम्ही नैसर्गिकरित्या डिटॉक्स राहता. त्याचसोबत शरिरातील मेटाबॉलिज्म ही वेगवान होते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

**डोकेदुखीवर लाभदायी**

तापाच्या कारणास्तव लक्ष केंद्रित करणे मुश्किल होते तर मड थेरपीची मदत घेऊ शकता. पोटाच्या आसपास माती लावल्याने अतिरिक्त गरमीपासून दूर राहू शकता आणि शरिर थंड राहण्यास मदत होते. त्याचसोबत हिट स्ट्रोकच्या समस्येपासून ही यामुळे आराम मिळतो. जेव्हा तुमचे खुप डोकं दुखत असेल तेव्हा औषधांऐवजी अशा प्रकारच्या ऑप्शनची निवड करू शकता.

**त्वचेसाठी फायदेशीर**

मड थेरपीचा सर्वाधिक मोठा फायदा हा त्वचेला होतो. आयुर्वेदानुसार मातीत विषारी पदार्थ दूर करण्याचा गुण असतो. शरिरातील पित्त ती नियंत्रित करू शकते. त्याचसोबत त्वचा ही मऊ आणि तजेलदार ही होते.

**तणावापासून दूर राहता**

माती ही नैसर्गिक रुपात थंड असते. यासाठी ही थेरपी तणापासून दूर राहण्यासाठी तुम्हाला मदत करू शकते.

## मधुमेह आणि हृदय विकार

डॉ बिपीनचंद्र भामरे, मुंबईतील सर एचएन रिलायन्स फाऊंडेशन हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरचे सल्लागार कार्डियाक सर्जन Diabetes and heart disorders मधुमेहींमध्ये जवळजवळ निम्मे हृदयविकार कोणत्याही लक्षणांशिवाय आढळून येतात. म्हणून त्यास सायलेंट किलर असे संबोधले जाते. मधुमेहामुळे हृदयाच्या विविध समस्यांना आमंत्रण मिळते.बदलत्या जीवनशैलीमुळे ३०-६० वयोगटातील व्यक्तींमध्ये मधुमेहाचे प्रमाण वाढते आहे. मधुमेहामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग (CVD), हृदयविकाराचा झटका तसेच हार्ट स्ट्रोकला साख्या समस्या उद्भवतात. अनियंत्रित मधुमेहामुळे हृदयविकाराचा झटका देखील येऊ शकतो.

रक्तातील साखरेची पातळी सतत वाढल्याने संपूर्ण शरीरात रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या, धमन्या आणि नसांचे नुकसान होऊ शकते. रक्तातील उच्च साखरेची पातळीने रक्तवाहिन्यांच्या धमनींच्या भिंतींवर प्लेक तयार होतो. परिणामी रक्तवाहिन्या अरुंद होतात, ज्यामुळे रक्त पंप करण्यासाठी हृदयाला अधिक मेहनत घ्यावी लागते. ही स्थिती एथेरोस्क्लेरोसिस म्हणून ओळखली जाते आणि हार्ट फेल्युअरचा धोका वाढतो. रक्तातील उच्च साखरेची पातळी हृदयाला रक्त प्रवाह अडथळे आणते. त्यामुळे मधुमेह असलेल्यांनी त्यांच्या हृदयाच्या आरोग्याबाबत सावधगिरी बाळगली पाहिजे. मधुमेहाचे व्यवस्थापन करणे आणि हृदय विकारांपासून दूर राहणे ही काळाची गरज आहे.

**मधुमेहींनी हृदयाची काळजी कशी घ्यावी**

नियमित तपासणी करा. रक्तदाब, रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉलच्या पातळीचे वेळोवेळी निरीक्षण करा. हृदयाशी संबंधित गुंतागुंत टाळण्यासाठी रक्तातील साखरेची पातळी शिफारस केलेल्या मर्यादेत राखणे आवश्यक आहे. मधुमेहींनी दररोज घरच्या घरी रक्तातील साखर आणि रक्तदाब तपासणे आणि डॉक्टरांनी दिलेली औषधे वेळोवेळी घेणे योग्य राहिल. दररोज व्यायाम करा आणि वजन नियंत्रणात राखा. चालणे, जॉगिंग, पोहणे, वेट ट्रेनिंग किंवा एरोबिक्स यासारख्या



व्यायामाची निवड करा. पौष्टिक आहाराचे सेवन करा. आपल्या आहारात ताजी फळे आणि भाज्यांचा समावेश करावा. जंक फुड, प्रक्रिया केलेले पदार्थ, तेलकट आणि हवाबंद डब्यातील पदार्थांपासून दूर रहा. हृदय निरोगी ठेवण्यासाठी धूम्रपान आणि अल्कोहोलचे सेवन टाळा. आपल्या कुटुंबातल्या कुठल्याही व्यक्तीला मधुमेहाचा विकार जडला तर स्वत:ला त्यापासून दूर ठेवण्यासाठी वेळीच आपल्या आरोग्याकडे लक्ष द्या.

## लोकसहभागातून किराणा किट वाटप हा स्तुत्य उपक्रम

लातूर : डॉ. व्दारकादास लोहिया यांनी निराधार वृध्दांसाठी हा उपक्रम सुरू केल्याने वृद्धाना मोठा आधार मिळाला आहे. आज १०० वयोवृद्ध निराधार महिलांना किराणा किट वाटप करण्यात आले त्यामुळे लोकसहभागातून किराणा किट वाटप हा मानवलोकचा स्तुत्य उपक्रम आहे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले. मानवलोक जनसहयोगतर्फे १०० वयोवृद्ध निराधार महिलांना किराणा किट वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर कॅप्टन प्रा. बाळासाहेब गोडबोले, कल्पना अनिकेत लोहिया, भागवत कांबळे, शशिकला कर्नावट, अरूण आसरडोहकर, प्रशांत बर्दापूरकर, राहुल देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. व्दारकादास लोहिया यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

लातूर
# भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com

## मणिपूर हिंसाचारातील सीबीआय चौकशीची प्रकरण गुवाहाटी उच्च न्यायालयाकडे वर्ग, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

दिल्ली : मणिपूर हिंसाचारामध्ये ज्या प्रकरणामध्ये सीबीआय चौकशी करत आहे त्या सर्व प्रकरणांची सुनावणी आता गुवाहाटी उच्च न्यायालयामध्ये होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने यावर निर्णय दिला आहे. तसेच गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी या प्रकणात अनेक भाषिक न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचे निर्देश देखील सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान मणिपूरमधील हिंसाचारातील एकूण २७ प्रकरणांमध्ये सीबीआय चौकशी करत आहे. ही सर्व २७ प्रकरणं आता गुवाहाटी उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्यात आली आहे. मणिपूरमध्ये महिलांची विवस्त्र धिंड काढून त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले होते. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला देखील खडसावले होते. या प्रकरणात सीबीआय मार्फत चौकशी करण्यात येत होती.



# ऑगस्टमध्ये सरासरीच्या केवळ ४२ टक्के पाऊस, १५ जिल्ह्यांत मोठी तूट

मुंबई : राज्यात उशीरा दाखल झालेल्या पावसाचे प्रमाण यंदाच्या वर्षी खूप कमी आहे. राज्यातील अनेक भागात पावसाने हवी तशी हजेरी लावलेली नाही. परंतु पावसाने सुरूवातीला हजेरी लावल्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणी केली होती. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारली आणि पेरणी केलेली उभी पीकं करपली. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त असून येत्या काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. अशातच पावसाबद्दल चिंता वाढणारी बातमी आहे. फक्त ऑगस्ट महिन्याचा विचार केला तर राज्यात सरासरीच्या उणे ५८ टक्के तूट निर्माण झाली आहे.

ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या फक्त ४२ टक्के पाऊस झाला आहे. मराठवाड्यात सरासरीच्या केवळ



२८ टक्के पाऊस झाला आहे. त्यामुळे त्याठिकाणी सर्वात विदारक परिस्थिती आहे. त्याखालोखाल मध्य महाराष्ट्र आणि कोकणात देखील केवळ ३६ टक्के पाऊस पडला आहे. त्यामुळे राज्यातील १५ जिल्ह्यात पावसाच्या सरासरीतली तूट मोठी आहे. या मोठ्या तुटीमुळे आणि हवामान खात्याने सांगितल्याप्रमाणे पुढचे काही दिवस पावसाची शक्यता नाही. त्यामुळे येत्या काही दिवसात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.

राज्यातील १५ जिल्ह्यात सरासरीच्या उणे २० टक्क्यांहून अधिक तूट आहे. शेतकऱ्यांनी सुरुवातीला पेरणी केली, मात्र त्यानंतर पावसाने दडी मारली आणि पेरणी केलेली उभी पीकं करपली आहेत. त्यामुळे बळीराजासह सगळ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. १ जूनपासून जालन्यात फक्त ५४ टक्के पाऊस, सांगली जिल्ह्यात फक्त ५६ टक्के पाऊस, अमरावतीत सरासरीच्या फक्त ६९ टक्के पाऊस झाला आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात विदारक परिस्थिती असून राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शासनाने राज्यात दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी केली आहे. राज्यात उशीरा दाखल झालेल्या पावसाने जुलै महिन्यात चांगली हजेरी लावली, मात्र ऑगस्ट महिन्यात पाठ फिरवली आहे. हवामान खात्याचे निर्देशानुसार ऑगस्ट महिन्याच्या उत्तरार्धात सरासरी पेक्षा कमी पाऊस पडणार अशी शक्यता वर्तविण्यात आली होती. मात्र पुढील महिन्यात ८ ते २१ सप्टेंबरदरम्यान राज्यात सरासरीइतका किंवा त्याहून जास्त पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात पावसाने चांगली हजेरी लावली तर बळीराजासह सर्वांना दिलासा मिळणार आहे.

# लातूर जिल्ह्यात ९ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

लातूर : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणच्या आदेशानुसार ९ सप्टेंबर २०२३ रोजी लातूर येथे तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोक अदालतीमध्ये अधिकाधिक पक्षकारांनी सहभागी होवून न्यायालयात दाखल असलेली प्रलंबित प्रकरणे तसेच दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा सुरेखा कोसमकर आणि सचिव श्रीमती एस. डी. अवसेकर यांनी केले आहे.

लातूर जिल्हा मुख्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरीय न्यायालयामध्ये घेण्यात येत असलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात, भू-संपादन, १३८ एन. आय. अ‍ॅक्ट, कौटुंबिक प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, कामगार, सहकार न्यायालय, वीज व पाणी बिल प्रकरणे, पगार व भत्ते प्रकरणे आणि सेवानिवृत्ती विषयक प्रकरणे, महसूल प्रकरणे व इतर दिवाणी प्रकरणे शिवाय वादपूर्व प्रकरणांमध्ये कलम १३८ एन. आय. अ‍ॅक्ट प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी बिल प्रकरणे, दूरध्वनी तथा मोबाईल कंपन्यांची प्रकरणे अशा सर्व प्रकारची तडजोडयोग्य प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये भूसंपादनाची प्रकरणेही तडजोडीसाठी ठेवण्यात येणार असून संबंधित शासकिय भू-संपादन विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळणार आहे. त्यामुळे संबंधित पक्षकारांनी आपल्या वकिलांशी त्वरीत संपर्क करून त्यांच्या भू-संपादनाची प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच अपघात दावा प्रकरणांमध्येही संबंधित विमा कंपन्यांची जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने मिटविण्यासाठी प्रयत्न होणार आहेत त्यामुळे ज्या पक्षकारांची अपघात दावा प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवून घेण्यासाठी संबंधित वकिलांशी व न्यायालयाशी संपर्क साधावा. त्याचप्रमाणे कौटुंबिक, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून मिटविण्यासाठी पक्षकारांनी पुढाकार घ्यावा.

लोक अदालत यशस्वी करण्यासाठी सर्व पक्षकार, विधिज्ञ व संबंधित अधिकाऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्ष सुरेखा कोसमकर, प्राधिकरणच्या सचिव श्रीमती एस. डी. अवसेकर, जिल्हा राकारी वकील अ‍ॅड. संतोष देशपांडे, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. महेश बामनकर यांनी केले आहे.



# जनकल्याण निवासी विद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम व्याख्यानमाला

## भाऊसाहेब उमाटे यांनी उलघडला मुक्तिसंग्रामाचा इतिहास

लातूर : मराठवाडा मुक्तिसंग्रामाची शौर्यगाथा शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी लातूर जिल्हा परिषदेचा माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा माहिती कार्यालय आणि बाबासाहेब परांजपे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची' ही ७५ व्याख्यानांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अभ्यासक तथा इतिहास संशोधक भाऊसाहेब उमाटे यांचे व्याख्यान बुधवारी हरंगुळ येथील जनकल्याण निवासी विद्यालयात आयोजित करण्यात आले होते.

जनकल्याण निवासी विद्यालयचे मुख्याध्यापक ज्ञानेश्र्वर सोनटक्के, व्याख्यानमालेचे समन्वयक दिलीप कानगुले, विद्यालयाचे अधीक्षक दत्ताभाऊ माने यावेळी उपस्थित होते.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाची सुरुवात, स्वातंत्र्य सैनिकांनी उभारलेले लढे, लातूर जिल्ह्यात घडलेल्या घटना आणि त्यामध्ये स्वातंत्र्य सैनिकांनी दिलेले योगदान आदी विषयांवर मार्गदर्शन करून श्री. उमाटे यांनी विद्यार्थ्यांसमोर मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्यातील विविध प्रसंग उलघडून सांगितले. विद्यार्थी, शिक्षक यावेळी उपस्थित होते.

# लवकरच शरद पवार, सुप्रिया सुळे भाजपाला पाठिंबा देतील -बावनकुळे

अमरावती : थोड्या दिवसांनंतर शरद पवार आणि सुप्रिया सुळे हे देखील भाजपला पाठिंबा देतील, असे वक्तव्य भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. अमरावतीमध्ये चंद्रशेखर बावनकुळेंनी माध्यमांशी बोलताना हे वक्तव्य केले. 'अजित पवार हे आमचे नेते आहेत. भाजपसोबत ते गेले म्हणून पक्षात फूट पडली, असे होत नाहीट, असे मोठे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. शरद पवार यांच्या विधानामुळे राजयकीय वर्तुळात सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. यासंदर्भात चंद्रशेखर बावनकुळेंना प्रश्न विचारल्यावर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मोदींच्या नेतृत्वात विश्वकर्मा योजना, ओबीसी घटकांकरता योजना यासारख्या असंख्य योजनांवर काम सुरू आहे. गेल्या नऊ वर्षात केंद्र सरकारला जे निर्णय घेता आले नाही, ते निर्णय या वर्षात घेऊ आणि केंद्र सरकारचे हेच काम पाहून शरद पवारचे लवकर मनपरिवर्तन होईल, यानंतर अजित पवार यांच्याप्रमाणे शरद पवार आणि सुप्रिया सुळे मोदींच्या नेतृत्वाला पाठिंबा देतील.

शरद पवार आणि सुप्रिया सुळे हे दोघे आगामी काळात भाजपसोबत सत्तेत येतील, असे वक्तव्य भाजप मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये यांनी देखील केली. यावेळी केशव उपाध्ये म्हणाले, शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांचे मनपरिवर्तन लवकरच होणार असल्याची खात्री असून देशाचा विकास हे फक्त मोदीच करू शकतात. पण शरद पवार आज म्हणत असतील की, भाजपसोबत जाणार नाही. आगामी काळात शरद पवार हे भाजपसोबत येतील असा विश्वासही उपाध्ये यांनी व्यक्त केला.

# 'अतिनील दृश्यमान स्पेक्ट्रोस्कोपीची प्रस्तावना आणि उपयोजन' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ ऑगस्ट २०२३ रोजी ' अतिनील दृश्यमान स्पेक्ट्रोस्कोपीची प्रस्तावना आणि उपयोजन ' या विषयावरील एक दिवसीय हॅंड्स-ऑन राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन झाले.या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे व साधन व्यक्ती म्हणून केंद्रीय विद्यापीठ,कलबुर्गी येथील डॉ.पालेपोगू राघवैय्या,विशेष उपस्थितीत दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी,संयुक्त सचिव सुरेशजी जैन,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,कार्यशाळा निमंत्रक व रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर, कार्यशाळा समन्वयक डॉ.नंदा कोरडे,सहनिमत्रंक डॉ.ईन्नूस पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड कार्यशाळा घेण्यामागची भूमिका स्पष्ट करताना असे सांगितले की,रसायनशास्त्राच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना रसायनशास्त्रातील स्पेक्ट्रोस्कोपीसारख्या संकल्पना, सिद्धांत आणि त्याचा वापर कसा करायचा,अशी माहिती तज्ज्ञ मार्गदर्शक व साधन व्यक्तीच्या माध्यमातून समजली पाहिजे,त्यांना त्यामधील अद्ययावत ज्ञान मिळाले पाहिजे.त्याचबरोबर अशा या विविध कार्यशाळा,चर्चासत्र आणि कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी घडलाच पाहिजे,असे म्हणाले.

या कार्यशाळेसाठी डॉ.जमन अंनगुलवार, डॉ.आण्णाराव चौगुले,प्रा.गोपाल अवस्थी,डॉ.रवींद्र शिंदे,डॉ.श्रेयस माहुरकर,प्रा.राहुल जाधव,प्रा.नवनाथ ढेकणे, प्रा.मनीषा मुंडे,प्रा.भाग्यश्री काळे, प्रा.विठ्ठल सोनकांबळे,डॉ.रामशेट्टी शेटकार,बापू जंगम,शंकर सूर्यवंशी,हरिओम पाटोळे, एल.बी.जोशी, तारासिंग ठाकूर,राम बिर्ले,अमोल क्षिरसागर,सुनील राक्षे,माधव मसलगे,अभय यमपाळे,महालिंग माळगे, शंकर भालके यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले आणि या कार्यशाळेत दयानंद विज्ञान महाविद्यालय,राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ उपकेंद्र,उस्मानाबाद येथील असे एकूण ११४ विद्यार्थी सहभागी होते.

# महिलांनी आधुनिक ऊस शेतीसोबत कृषीपुरक जोडधंदा करणे काळाची गरज

वैशालीनगर : शेती करीत असताना शेतीसोबत पशूपालन, दुग्धव्यवसाय सारखे जोडधंदे केल्यास शेती देखील परवडते. महिलांनी आधुनीक पध्दतीने शेती केल्यास आर्थिक उत्पन्न वाढेल, घरात आर्थिक स्थिरता येईल याकरीता आधुनिक ऊस शेतीसोबत कृषीपुरक एखादा तरी जोडधंदा करणे ही काळाची गरज आहे, असे विलास सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यानी म्हटले आहे.

विलास सहकारी साखर कारखाना लि. वैशालीनगर, निवळी, येथे कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक महिला सभासदासाठी 'ऊस पीक लागवड व संगोपन तंत्रज्ञान' या विषयावर 'महिला मेळावा' गुरुवार, दि. २४ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता कारखाना कार्यस्थळावर आयोजित करण्यात आला होता. यामध्ये अध्यक्षीय मनोगतात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अगोदर ऊसशेती यांत्रीकीकरणासाठीची लागणारे यंत्र व अवजारे प्रर्दशनाचे त्यांनी उदघाटन केले.

यावेळी विचारपिठावर रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, संत शिरोमणी मारूती महाराज साखर कारखान्याचे चेअरमन गणपतराव बाजूळगे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन अनंतराव देशमुख, ट्वेन्टीवन शुगर लि. चे व्हा. चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र व्ही. काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, डॉ. सारीका देशमुख, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पूणेचे वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ.जे.एम. रेपाळे, वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ.सौ. प्रिती देशमुख, संशोधन अधिकारी सचिन पाटील, वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ.सौ. सुधा घोडके, डॉ. जी.एस. कोटगिरे, सुनिता आरळीकर, सीमा क्षिरसागर, सोनाली थोरमोटे, शितल फुटाणे आदी उपस्थित होते.



यावेळी बोलताना चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख पुढे म्हणाल्या, शेतीत महिलांचे योगदान मोठे आहे. घरातील शेतीच्या कामाची जबाबदारी महिलांच्या हाती आल्यास अधिक चांगले उत्पन्न मिळेल. महिला शेती सचोटीने व काटकसरीने करतात त्यांना त्या कामात आवड आहे. यामुळे शेतीच्या कामाची जबाबदारी घेवून आधूनिक ऊसाची शेती करावी. येणाऱ्या काळात येथील महिलांना ऊसाची आधुनिक शेती करता यावी यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे असे सांगितले.

यावेळी प्रारंभी लातूर जिल्हा मध्यवर्तीचे फिल्ड ऑफिसर अंगद मगर यांनी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या महिला, महिला बचत गट आणि शेतीचा जोडधंदा करण्यासाठी सुरू असलेल्या योजनांची माहिती दिली. महिला मेळावा कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्हा.चेअरमन रविंद्र व्ही. काळे यांनी केले. कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राहुल इंगळे पाटील यांनी केले. तर आभार संचालक अनंत बारबोले यांनी मानले.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९


SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

## जाहिर प्रगटन

या प्रगटनाद्वारे जाहिर करण्यात येते की, माझे नाव काही ठिकाणी **SHEGASARE SACHIN VISHWANATH** हे असुन इतर कागदोपत्री माझे नाव **SHEGASARE SACHIN VISHVANATH** असे आहे. या पुढील सर्व कागदोपत्री व खाजगी व्यवहारात मी माझे हेच नवीन नाव **SHEGASARE SACHIN VISHVANATH** वापरात घेईन याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

जुने नाव : **SHEGASARE SACHIN VISHWANATH**
नवे नाव : **SHEGASARE SACHIN VISHVANATH**
पत्ता : **AT POST KARADKHED, TQ. UDGIR, DIST. LATUR**

## जाहिर प्रगटन

या प्रगटनाद्वारे जाहिर करण्यात येते की, माझे नाव काही ठिकाणी **SHEGASARE VISHWANATH SHANKAR** हे असुन इतर कागदोपत्री माझे नाव **SHEGASARE VISHVANATH SHANKAR** असे आहे. या पुढील सर्व कागदोपत्री व खाजगी व्यवहारात मी माझे हेच नवीन नाव **SHEGASARE VISHVANATH SHANKAR** वापरात घेईन याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

जुने नाव : **SHEGASARE VISHWANATH SHANKAR**
नवे नाव : **SHEGASARE VISHVANATH SHANKAR**
पत्ता : **AT POST KARADKHED, TQ. UDGIR, DIST. LATUR**

# कृषिमंत्री मुंडे घेणार मराठवाड्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा आढावा; औरंगाबादेत बोलावली बैठक

औरंगाबाद : मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्यामुळे दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान याच पार्श्र्वभूमीवर औरंगाबाद येथील विभागीय आयुक्त कार्यालयात मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांच्या पीक पाणी व पावसाच्या एकूण परिस्थितीचा आज आढावा घेणारी बैठक बोलवण्यात आली आहे. राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत ही बैठक होणार आहे. तर यावेळी राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील हेही या बैठकीस व्हर्च्युअली उपस्थित राहणार असून, मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यातील मंत्रीही या बैठकीस उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

कृषिमंत्री मुंडे यांनी बोलावलेल्या या बैठकीत बीड, जालना, औरंगाबाद, लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी, उस्मानाबाद या आठही जिल्ह्यातील पावसाचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच पावसाचे प्रमाण, ओढ दिलेल्या क्षेत्रात पिकांची परिस्थिती तसेच शेतकऱ्यांना अंतरिम दिलासा देण्यासाठी करावयाच्या उपाययोजना आदी सर्वच विषयांवर व्यापक चर्चा व निर्णय होणे अपेक्षित आहे.

ऑगस्ट महिना कोरडा गेल्याने मराठवाड्यात आता पाणी टंचाई जाणवू लागली आहे. अनेक गावात पिण्यासाठी पाणी उपलब्ध नसल्याने अशा गावात प्रशासनाकडून टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. विशेष म्हणजे अनेक महत्वाच्या प्रकल्पात देखील अल्प पाण्याचा साठा असल्याने चिंता वाढली आहे. तर काही प्रकल्प अक्षरशः कोरडे पडले आहेत. त्यामुळे आगामी काही दिवसांत विभागात पाऊस न झाल्यास परिस्थिती आणखीच गंभीर होऊ शकते. तसेच मराठवाड्याला दुष्काळाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे या सर्व पार्श्र्वभूमीवर आता प्रशासन आणि सरकारकडून दखल घेण्यात येत आहे. यासाठी वेगवेगळ्या उपयोजना देखील करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून कृषिमंत्री मुंडे यांनी आज औरंगाबादमध्ये मराठवाडा विभागाची आढावा बैठक बोलावली आहे. त्यामुळे या बैठकीत आज कोणते-कोणते निर्णय घेतले जाणार हे पाहणं महत्वाचे ठरणार आहे. या बैठकीस कृषीमंत्री धनंजय मुंडे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील, यांसह अन्य मंत्री महोदय, तसेच विभागीय आयुक्त, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू, कृषी आयुक्त, तसेच सर्व जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांसह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष किंवा व्हर्च्युअल पद्धतीने उपस्थित राहतील.